# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. ०९ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ५० ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


### विरोधी पक्षांची नवी रणनीती : एकात्मतेचे बळ आणि पुढील आव्हाने

राजधानी दिल्लीमध्ये पार पडलेली 'इंडिया' आघाडीची बैठक ही देशाच्या बदलत्या राजकीय समीकरणांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानली पाहिजे. या बैठकीच्या माध्यमातून विरोधी पक्षांनी केंद्र सरकारविरुद्ध अत्यंत आक्रमक आणि सुनियोजित रणनीती आखल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी दिलेल्या

---> अग्रलेख - पान 2 वर

### आरे वसाहतीतील झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव अखेर रद्द

मुंबई : आरे दुग्ध वसाहतीतील झोपडपट्टी पुनर्वसनासाठी २० वर्षांपूर्वी एका खासगी कंपनीला दिलेली ३३.६ एकर मोक्याची जमीन अखेर राज्य शासनाने पुन्हा ताब्यात घेतली आहे. तत्कालीन सरकारने २८ जून २००६ रोजी मे. बामकोटेक प्रा. लि. कंपनीच्या बाजूने जारी केलेला वादग्रस्त शासन निर्णय रद्द करण्यात आला असून, यासंबंधीचा नवा 'जीआर' सोमवारी जारी करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानंतर या प्रस्तावाला अंतिम मंजुरी दिली.

## घरगुती गॅस सिलेंडर आणखी महाग होणार

**मुंबई :** देशातील सर्वसामान्य नागरिकांना महागाईचा आणखी एक मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतीत नुकतीच वाढ झाली असतानाच, येणाऱ्या काळात गॅस आणखी महाग होणार असल्याचे संकेत केंद्र सरकारनं दिले आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या भू-राजकीय तणावामुळे आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे एलपीजी गॅसच्या किमतींवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी या वाढत्या महागाईवर सरकारची बाजू स्पष्ट करताना, आगामी काळात पेट्रोल-डिझेलसह गॅस सिलेंडरचे दर आणखी वाढू शकतात, असं स्पष्ट केलं आहे.

केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी वाढत्या दरांवर स्पष्टीकरण देताना जागतिक संकटाचा दाखला दिला. ते म्हणाले की, "गॅस सिलेंडरच्या किमती वाढल्यामुळे आम्हालाही दुःख आणि खेद आहे. मात्र, यावर टीका करण्यापूर्वी लोकांनी जगातील सद्यस्थिती समजून घेतली पाहिजे. सध्या संपूर्ण जग गंभीर संकटाचा सामना करत आहे. जगभरात मालाची वाहतूक आणि पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे."

प्रल्हाद जोशी पुढे म्हणाले की, "एलपीजी गॅस आता अत्यंत मर्यादित ठिकाणांवरून उपलब्ध होत आहे. गॅसची मूळ किंमत वाढली आहे. शिवाय, माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचवण्यासाठी आता तब्बल 40 ते 45 दिवस लागत आहेत, ज्यामुळे वाहतुकीचा खर्च आणि विम्याचा खर्च कमालीचा वाढला आहे." आम्ही सर्वसामान्य जनतेच्या अडचणींबाबत तितकेच चिंतित आहोत, परंतु सध्याच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमध्ये गॅसच्या किमती वाढवणे हा सरकारचा नाईलाज झाला असल्याचं केंद्रीय मंत्र्यांनी स्पष्ट केलं. आहे. नुकतंच 7 जून रोजी घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतीत प्रति सिलेंडर 29 रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या ताज्या दरवाढीनंतर आता मुंबईमध्ये 14.2 किलोच्या घरगुती गॅस सिलेंडरची किंमत 942 रुपयांवर पोहोचली आहे.

यापूर्वी कमर्शियल गॅस सिलेंडरच्या दरांमध्येही मोठी वाढ नोंदवली गेली होती. यामुळे हॉटेल व्यावसायिक, केटरर्स आणि खाद्यपदार्थांशी निगडित व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये आधीच प्रचंड चिंतेचे आणि तणावाचे वातावरण आहे. आता घरगुती गॅस सिलेंडरचे दर पुन्हा वाढणार असल्याने गृहिणींचे बजेट पूर्णपणे कोलमडणार असल्याचे चित्र आहे.

## तृणमूल काँग्रेसचे 14 बंडखोर खासदार भाजपच्या वाटेवर



नवी दिल्ली : पश्चिम बंगालमध्ये सत्ता गमावल्यानंतर राष्ट्रीय पातळीवरही 'तृणमूल काँग्रेस' पक्षाला सर्वात मोठे खिंडार पडले आहे. सोमवारी (८ जून ) नवी दिल्लीत एकीकडे 'इंडिया' आघाडीची बैठक सुरू असतानाच, दुसरीकडे तृणमूलच्या तब्बल १४ बंडखोर खासदारांचा गट भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांच्या निवासस्थानी पोहोचल्याने राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. या बैठकीला पश्चिम बंगालचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी देखील उपस्थित होते.

सोमवारी दुपारी अचानक दिल्लीत दाखल झालेले मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी हे थेट भाजपचे ज्येष्ठ नेते भूपेंद्र यादव यांच्या निवासस्थानी पोहोचले. तृणमूल काँग्रेसच्या लोकसभेतील एकूण खासदारांपैकी तब्बल १४ बंडखोर खासदार या गुप्त बैठकीला उपस्थित होते.या ऐतिहासिक बंडामध्ये त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री आणि भाजप नेते बिप्लव कुमार देव हे देखील महत्त्वाची भूमिका बजावत असून, ते तृणमूलच्या खासदारांना भाजपमध्ये आणण्यासाठी मध्यस्थी करत आहेत. या १४ खासदारांच्या बंडामुळे लोकसभेत तृणमूल काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्याचे स्पष्ट होत आहे. पक्षांतर बंदी कायद्याच्या कचाट्यातून वाचण्यासाठी हे खासदार भाजपला थेट पाठिंबा देण्याची किंवा अधिकृतपणे पक्षात प्रवेश करण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

भाजप नेत्यांच्या घरी चाललेल्या या महाबैठकीपूर्वी दिल्लीत आणखी एक नाट्यमय घटना घडली होती. सकाळीच राज्यसभा खासदारकीचा आणि पक्षाचा राजीनामा देणारे तृणमूलचे ज्येष्ठ नेते सुखेंदु शेखर राय यांच्या निवासस्थानी ५ प्रमुख खासदारांनी गुप्त भेट घेतली होती. या बैठकीला शर्मिला सरकार (बर्धमान पूर्व), प्रसून बॅनर्जी (हावडा), जगदीश बसुनिया (कूचबिहार), कालिपद सोरेन (झारग्राम), अरूप चक्रवर्ती (बांकुरा) हे खासदार उपस्थित होते. सुखेंदु शेखर राय यांच्याशी सखोल चर्चा केल्यानंतर हेच खासदार आता इतर सहकाऱ्यांसह सुवेंदू अधिकारी यांच्या उपस्थितीत सुरू असलेल्या बैठकीला पोहोचल्याचे समजते.

ममता बॅनर्जींची अस्तित्वाची लढाई

राज्यसभेत एक दशकाहून अधिक काळ पक्षाचा मुख्य चेहरा राहिलेले सुखेंदु शेखर राय यांनी सोडलेली साथ आणि त्यानंतर लोकसभेच्या १४ खासदारांनी पुकारलेले बंड यामुळे तृणमूल काँग्रेस प्रमुख ममता बॅनर्जी राष्ट्रीय राजकारणात पूर्णपणे एकट्या पडल्या आहेत. बंगालमधील बंडखोर आमदार आणि नवनिर्वाचित विरोधी पक्षनेते ऋतब्रत बॅनर्जी यांनी आधीच दावा केला आहे की, "ममता बॅनर्जी यांची आमदारांवरील पकड पूर्णपणे ढिली झाली असून, अनेक टीएमसी आमदार आमच्या संपर्कात आहेत. आधी बंगालमधील सत्ता जाणे, त्यानंतर आमदार फुटणे आणि आता थेट संसदेतील खासदारही भाजपच्या वाटेवर असल्याने तृणमूल काँग्रेससमोर आतापर्यंतचे सर्वात मोठे अस्तित्वाचे संकट निर्माण झाले आहे.

## भारताच्या राजकारणात नव्या राजकीय पक्षाची एन्ट्री
### सुप्रीम कोर्टाच्या माजी न्यायाधीशांची घोषणा

**मुंबई :** सोशल मीडियावर कॉकरोच जनता पार्टीची जोरदार चर्चा आहे. आता कॉकरोच जनता पार्टीच्या विरोधात आणखी पक्षाने एन्ट्री मारली आहे. 'इश्क करो पार्टी' असे डिजिटल पक्षाचे नाव आहे. सुप्रीम कोर्टाचे माजी न्यायाधीश मार्कण्डेय काटजू यांनी 'एक्स'वर पोस्ट करत नव्या पक्षाची घोषणा केली. त्यांनी पोस्ट करत तरुणांना सामील होण्याचे आवाहन केलं आहे.

माजी न्यायाधीशांनी स्पष्ट केलं आहे की, नवा पक्षात युद्ध, द्वेषाला थारा नसेल. प्रेमाला प्रोत्साहन देण्यासाठी पक्षाची स्थापन केली आहे. पक्षात युवकांनी सामील होण्यासाठी काटजू यांनी अनेक पोस्ट सोशल मीडियावर केल्या आहेत. एका पोस्टमध्ये म्हटलं की, ' ज्या लोकांना 'इश्क करो पार्टी'त सहभागी व्हायचं आहे. त्यांचा मी संरक्षक असेल. तुम्ही Ishqkaroparty@gmai.com वर संपर्क करू शकतात.

काटजू यांनी एका पोस्टमध्ये लिहिलं की, अनेकांना हा उपक्रम मस्करी वाटत आहे, परंतु त्यांचा गैरसमज झाला आहे. काही लोकांन वाटत असेल, 'इश्क करो पार्टी' म्हणजे कोणतीही मस्करी नाही. तरुण-तरुणींच्या प्रेमसंबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी व्हॅलेंटाइन डे सारखा उपक्रम असल्याचे वाटत असेल. परंतु हा एक गैरसमज आहे'.

## भेटूया पुण्यात, जय महाराष्ट्र! अभिजीत दीपकेची घोषणा; कॉकरोच जनता पार्टी करणार पुण्यात आंदोलन

**पुणे :** कॉकरोच जनता पार्टी आता पुण्यात आंदोलन करणार आहे. कॉकरोच जनता पार्टीचा संस्थापक अभिजीत दीपके यानं ही घोषणा केली आहे. ११ जून रोजी पुण्यात हे आंदोलन होईल. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणार आहेत. दिल्लीतील जंतर - मंतरवर आंदोलन केल्यानंतर कॉकरोच जनता पार्टी हे दुसरं आंदोलन करणार आहे.

दिल्लीत जंतर-मंतरवर ६ जून रोजी कॉकरोच जनता पार्टीनं आंदोलन केलं होतं. पार्टीचा संस्थापक अभिजीत दीपके हा या आंदोलनात सहभागी झाला होता. तिथेही त्यांनी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली होती. आता दिल्लीनंतर थेट महाराष्ट्रातील पुण्यात आंदोलन करण्यात येणार आहे.

दीपके आणि पक्षाच्या वतीने या आंदोलनाबाबत माहिती दिली आहे. यासंदर्भात



त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. महाराष्ट्रातील पुण्यात आंदोलन करण्यात येणार असून, शिक्षण मंत्री प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येणार आहे. येत्या गुरुवारी (ता. ११) संध्याकाळी ४ वाजता पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठात या आंदोलनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

दिल्लीत पहिलं आंदोलन

कॉकरोच जनता पार्टीच्या घोषणेनंतर पक्षाने शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी शनिवार, ६ जून रोजी दिल्लीच्या जंतर मंतरवर पहिलं आंदोलन केले होते. या आंदोलनात विद्यार्थ्यांसह नागरिक सहभागी झाले होते. पक्षाचा संस्थापक अभिजीत दीपके हा या आंदोलनासाठी अमेरिकेहून दिल्लीत पोहोचला होता. सोनम वांगचूक हे देखील या आंदोलनात सहभागी झाले होते. जंतर-मंतरवरील आंदोलनात अनेक नागरिक कॉकरोचचे मुखवटे घालून आले होते. अनेक विद्यार्थी आपल्या पालकांसमवेत जंतर - मंतरवर आले होते.

## LPG गॅस सबसिडीच्या नियमात मोठा बदल
## अनुदानित सिलिंडरची संख्या 9 वरून 4 वर,उज्ज्वला लाभार्थ्यांना झटका

**मुंबई :** LPG गॅस सबसिडीच्या नियमात मोठा बदल करण्यात आला आहे. सरकारच्या पंतप्रधान उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना मोठा झटका बसणार आहे. सरकारने अनुदानित एलपीजी सिलिंडरच्या संख्या १२ वरून ९ त्यानंतर ४ केली आहे. आता या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना वार्षिक अनुदानित ४ सिलिंडर मिळणार आहेत.

पश्चिम आशियामध्ये अमेरिका आणि इराणमध्ये पुन्हा एकदा संघर्ष होण्याची शक्यता आहे. दोन्ही देशातील तणावामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर एलपीजीच्या किंमतीत वाढ होताना दिसत आहे. आतापर्यंत युद्धामुळे एलपीजीच्या किंमतीत ४६ टक्क्यांनी महागला आहे.

जगभरात कच्च्या तेलाच्या किंमती आणि गॅसच्या किमतीत चढ-उतार पाहायला मिळत आहे. गॅसच्या किंमती वाढल्याने भारतातील घराघरात स्वयंपाकासाठी लागणारा एलपीजी सिलिंडरच्या किंमती वाढू लागल्या आहेत.

भारतातील पेट्रोलियम उत्पादनाच्या किंमती आंतरराष्ट्रीय बाजारावर अवलंबून असतात. आंतरराष्ट्रीय बाजारात चढ-उतार सुरू असताना केंद्र सरकारने घरगुती एलपीजी गॅसची किंमती नियंत्रणात ठेवल्या होत्या. परंतु आज सरकारने एलपीजी गॅसच्या नियमात बदल करून सर्वसामान्यांना मोठा झटका दिला आहे.

## राज्यात बोगस शाळांचा सुळसुळाट

**मुंबई :** तुमच्या मुलांसाठी नवीन शाळा शोधतायत... तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे... राज्यात बोगस शाळांचा सुळसुळाट झालाय...त्यामुळे साम टीव्हीनं या बोगस शाळांचा इन्व्हेस्टीगेशन करून पर्दाफाश केलाय. कोणत्या जिल्ह्यात किती बोगस शाळा आहेत याची यादीच दूरचित्रवाणीच्या हाती लागली आहे.

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झालंय आणि पालकांची आपल्या मुलांच्या प्रवेशासाठी लगबग सुरू झालीय.... मात्र तुम्ही ज्या शाळेत आपल्या मुलाचा प्रवेश घेताय, ती शाळा अधिकृत आहे का? कारण, राज्यातील बोगस आणि अनधिकृत शाळांची धक्कादायक यादी 'साम टीव्ही'च्या हाती लागलीय. राज्यात तब्बल 172 शाळा बोगस असल्याचं साम टिव्हीच्या इन्वेस्टिगेशनमध्ये समोर आलयं.. अनेक शिक्षण संस्था केवळ 'इरादापत्र' मिळताच शाळा सुरू करतात किंवा मान्यता नसताना शाळा दुसऱ्या जागेत स्थलांतरित करतात. त्यामुळे राज्यात बोगस शाळांचा सुळसुळाट कसा झालाय... पाहूयात...

मुंबई - 132, पालघर- 20, ठाणे- 18, नागपूर- 1, नाशिक- 1.

प्रतिनिधीनं या प्रकरणात अधिक माहिती घेण्यासाठी थेट शिक्षण संचालकांना गाठलं... त्यावेळी या बोगस शाळांवर तब्बल 1 लाख रुपयांचा आणि त्यानंतर दररोज 10 हजार रुपयांचा दंड ठोठावला जाणार असल्याची माहिती शिक्षण संचालकांनी दिली....एवढंच नाही, तर बोगस शाळांना पाठीशी घालणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांवरही आता थेट कारवाई होणार आहे.

**पालकांनी मुलांचा शाळेत प्रवेश घेतना काय खबरदारी घ्यायला हवी ? :** शिक्षणाधिकारी कार्यालयाद्वारे वर्षातून दोनदा अनधिकृत शाळांची अद्ययावत यादी वृत्तपत्रे, शासकीय संकेतस्थळे आणि सोशल मीडियावर प्रसिद्ध केली जाते. ही यादी पालकांनी वेळोवेळी तपासावी.. सर्व अधिकृत आणि मान्यताप्राप्त शाळांनी त्यांच्या प्रवेशद्वारावर किंवा मुख्य इमारतीवर त्यांचा शासकीय मान्यता क्रमांक, UDISE क्रमांक आणि बोर्डाचे संलग्नता प्रमाणपत्र क्रमांक ठळकपणे प्रदर्शित करणं बंधनकारक असतं..

त्यामुळे ही माहिती संस्थाचालकांक़डून मागावी आणि त्यानंतरच शाळेत प्रवेश घ्यावा.. त्याशिवाय शाळेच्या परिसराजवळ 'सदर शाळा अनधिकृत आहे' असा इशारा देणारा फलक शासनातर्फे लावला जाणार आहे. ज्यामुळे शाळा बोगस असल्यास कुठल्याही प्रलोभनाला न भुलता पाल्यांचा प्रवेश घेणं टाळावं..



**पैठणगेटवरील चारचाकी रस्त्यावर:** पैठणगेट मागील वाहनतळावर दुचाकी,चारचाकी वाहने लावण्यासाठी वाहनतळाची व्यवस्था असली तरी गाड्यांची संख्या वाढतच असल्याने कार चकचकीत सिमेंट रोडवर उभ्या करून वाहनतळ चालक बिनधास्तपणे पैसा वसूल करत वाहतूक पोलीस,मनपाच्या डोळ्यात धूळफेक करत आहे.

## अंबड तहसीलदार लाच प्रकरणात ट्विस्ट, तक्रारदार सुयोग सोळुंकेला अटक; दोन दिवसांची पोलीस कोठडी



**जालना :** बीड आणि जालना (Jalna) जिल्ह्यातील एकाच दिवसात झालेल्या दोन लाचखोरीच्या प्रकरणाने महाराष्ट्रातील भ्रष्ट प्रशासकीय सेवेचा दाखलाच समोर आणला. या कारवाईनंतर सोशल मीडियातून स्वागत झालं, पण तहसीलदारसारख्या उच्च पदस्थ व्यक्तीकडून अशाप्रकारे लाच घेतल्यावरुन संतापही व्यक्त झाला आहे. आता, अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांच्या गाजलेल्या लाच प्रकरणात चांगलाच ट्विस्ट पाहायला मिळत आहे, याप्रकरणी मोठी घडामोड समोर आली आहे. अंबड लाच (Bribe) प्रकरणातील तक्रारदार सुयोग सोळुंके याला जालन्यातील गोंदी पोलिसांनी (Police) अटक केली आहे. सुयोग सोळुंके याच्यावर 2025 मध्ये अवैध वाळू चोरीचे दोन गुन्हे दाखल होते, याप्रकरणी त्याला पोलिसांनी अटक केल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केलं आहे. कारण, 2025 मध्ये दाखल गुन्ह्यात त्याला आजपर्यंत अटक का करण्यात आली नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

आरोपी सुयोग सोळुंकेवर अवैध वाळू उत्खनन, वाळू चोरी आणि मारहाणीसह विविध गंभीर गुन्हे दाखल होते. तसेच त्याच्यावर एक वर्षासाठी तडीपारीची कारवाईही देखील करण्यात आली होती. दोन महिन्यांपूर्वीच त्याची या कारवाईतून जामीनावर सुटका करण्यात आली होती. दरम्यान, अवैध वाळू उत्खननासाठी वापरल्या जाणारे पोकलेन मशीन आणि सहा हायवा वाहने सुरू ठेवण्यासाठी सोळुंके याने तहसीलदार विजय चव्हाण यांना 6 लाख 40 हजार रुपयांची लाच दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणात बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून तहसीलदार विजय चव्हाण यांना रंगेहाथ अटक केली होती. आता वाळू चोरीच्या गुन्ह्यात सुयोग सोळुंके याला अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, आरोपी सुयोग सोळुंकेवर यापूर्वी एमपीडीए कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला होता. पोलीस ठाणे गोंदी गु र नं 217/2025, 218/2025, 230/2025 सर्व कलम 303(2),3(5) भा न्या सं सह कलम 3, 4 गौण खनिज (विकास व विनियमन) प्रतिबंध अधिनियमान्वये अटक करण्यात आली होती. याप्रकरणात, त्याची जामीनावर सुटका करण्यात आली आहे.

एकाच दिवशी एसीबीच्या दोन धाडी

एसीबीने शनिवारी एकाच दिवशी दोन ठिकाणी धाड टाकत आधी पोलीस (Police) अंमलदारास 10 हजारांची लाच घेताना रंगेहात अटक केली. तर, दुसऱ्या धाडीत थेट तहसीलदारालाच बेड्या ठोकल्या. अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांना एका

## शेअर बाजारात सेन्सेक्स 719 अंकांनी कोसळला, निफ्टीतही मोठी घसरण
### गुंतवणूकदारांचे कोट्यवधी बुडाले

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात सप्ताहाच्या सुरुवातीलाच गुंतवणूकदारांना मोठा झटका बसला आहे. जागतिक बाजारातील कमकुवत संकेत आणि कच्च्या तेलाच्या (Crude Oil) वाढत्या किमतींमुळे भारतीय बाजारात आज घसरण झाल्याचं पाहायला मिळालं. आजच्या सत्रादरम्यान मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 'बीएसई सेन्सेक्स' तब्बल 719 हून अधिक अंकांनी कोसळला. तर दुसरीकडे, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक 'निफ्टी 50' देखील 243 अंकांनी घसरून 23,123 वर पोहोचला. बाजारातील या अचानक आलेल्या भूकंपामुळे गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपये एकाच झटक्यात बुडाले आहेत.

बाजार विश्लेषकांच्या मते, आजच्या या मोठ्या घसरणीमागे जागतिक आणि अंतर्गत पातळीवरील खालील प्रमुख घटक कारणीभूत ठरले आहेत.

**कच्च्या तेलाच्या किमतीत भडका :** आंतरराष्ट्रीय बाजारात ब्रेंट क्रूड ऑईलच्या किमतींमध्ये झालेली मोठी वाढ हे बाजार घसरण्याचे सर्वात मुख्य कारण आहे. भारत हा खनिज तेलाचा मोठा आयातदार देश असल्याने तेलाच्या किमती वाढल्यास देशांतर्गत महागाई वाढण्याची भीती निर्माण होते.

भू-राजकीय तणाव आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेषतः पश्चिम आशियातील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी, जागतिक गुंतवणूकदारांनी जोखमीच्या मालमत्तांमधून (इक्विटी) पैसे काढून घेण्यास सुरुवात केली आहे.

**परदेशी गुंतवणूकदारांची विक्री :** परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांकडून भारतीय बाजारात सातत्याने शेअर्सची विक्री केली जात आहे, ज्यामुळे बाजाराला वरच्या पातळीवर टिकून राहणे कठीण झाले आहे.

**सर्वच क्षेत्रांतील शेअर्समध्ये मोठी पडझड :**

बाजारातील आजची घसरण ही केवळ ठराविक शेअर्सपुरती मर्यादित नसून ती सर्वसमावेशक (Broad-based) होती. निफ्टी बँक, ऑटो, आयटी, एफएमसीजी आणि रियल्टी या सर्वच क्षेत्रांतील निर्देशांकांमध्ये 1 ते 2 टक्क्यांची मोठी घसरण नोंदवली गेली आहे.

आगामी काही सत्रांमध्ये कच्च्या तेलाच्या किमती आणि अमेरिकन बाजारातील घडामोडींवरच भारतीय शेअर बाजाराची पुढील दिशा अवलंबून असणार आहे.

## जि.प.च्या कामकाजावर आ.बंब यांचा सवाल
### जलजीवन मिशन, शिक्षण विभागासह विविध योजनांची घेतली झाडाझडती; 15 दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, गंगापूर-खुलताबाद मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांनी सोमवारी जिल्हा परिषदेत विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेत अनेक योजनांच्या अंमलबजावणीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. विकासकामांमधील त्रुटी, प्रलंबित प्रश्न आणि कामांच्या गुणवत्तेबाबत अधिकाऱ्यांना जाब विचारत त्यांनी संबंधित प्रकरणांची सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले.

बैठकीत जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या कामांवर विशेष चर्चा करण्यात आली. अनेक गावांमधील योजनांच्या प्रगतीबाबत



समाधानकारक माहिती मिळत नसल्याचे सांगत कामांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची आवश्यकता आमदार बंब यांनी व्यक्त केली. निधीचा वापर, कामांची गुणवत्ता आणि पूर्णत्वाची स्थिती याबाबत स्वतंत्र तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश यावेळी देण्यात आले.

शिक्षण विभागाच्या कामकाजाचाही आढावा घेण्यात आला. शाळांमधील शिक्षकांची उपस्थिती, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा प्रश्न आणि प्रशासकीय नियंत्रण यावर चर्चा करत शिक्षण व्यवस्थेत अधिक शिस्त आणण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. शिक्षकांच्या उपस्थितीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबतही विचारविनिमय करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषदेच्या विविध विकासकामांशी संबंधित काही जुन्या प्रकरणांवरही चर्चा झाली. अनियमिततेच्या तक्रारींची वस्तुनिष्ठ चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी भूमिका आमदार बंब यांनी मांडली.

बैठकीच्या शेवटी सर्व विभागांनी १५ दिवसांच्या आत प्राथमिक अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले. विकासकामांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व राखत नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने अधिक तत्परतेने काम करावे, असे आवाहन आमदार बंब यांनी केले.

## आठवीतील विद्यार्थिनीला बळजबरी दारू पाजली; नंतर हॉटेलमध्ये घेऊन गेले अन्...

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील दुर्गापूरमधील कबिगुरु परिसरातील एका हॉटेलमध्ये आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीवर झालेल्या सामूहिक बलात्काराच्या प्रकरणात सोमवारी पोलिसांनी महत्त्वपूर्ण कायदेशीर कारवाई केली. कडक सुरक्षा व्यवस्थेत, पोलिसांनी अटक केलेली मुख्य सूत्रधार महिला, हॉटेलचा मॅनेजर आणि इतर दोन मुख्य आरोपींना दुर्गापूर उप-विभागीय न्यायालयात हजर केले. या गंभीर गुन्ह्याचे स्वरूप पाहता, संपूर्ण घटनेच्या तपासासाठी पोलिसांनी आरोपींची पोलीस कोठडी मागितली. न्यायालयात हजर करण्यात आलेल्या आरोपींमध्ये पीडितेला आमिष दाखवून गुंगीचे औषध देणारी मुख्य आरोपी सिमरन तामांग, सामूहिक बलात्कारातील आरोपी अजरुद्दीन मल्लिक आणि सुबीर दास, तसेच हॉटेल मॅनेजर राजकुमार दे यांचा समावेश आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## विरोधी पक्षांची नवी रणनीती : एकात्मतेचे बळ आणि पुढील आव्हाने

राजधानी दिल्लीमध्ये पार पडलेली 'इंडिया' आघाडीची बैठक ही देशाच्या बदलत्या राजकीय समीकरणांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानली पाहिजे. या बैठकीच्या माध्यमातून विरोधी पक्षांनी केंद्र सरकारविरुद्ध अत्यंत आक्रमक आणि सुनियोजित रणनीती आखल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या ऐतिहासिक बैठकीला तब्बल पंचवीस पक्षांचे प्रमुख नेते उपस्थित होते. यामध्ये सोनिया गांधी, राहुल गांधी, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, उद्धव ठाकरे यांच्यासह अनेक दिग्गजांचा समावेश होता. या बैठकीतून विरोधकांनी केवळ एकजूटच दाखवली नाही, तर देशासमोरील महत्त्वाच्या ज्वलंत प्रश्नांवर सरकारला संसदेत आणि संसदेबाहेर कशा प्रकारे घेरले जाईल, याचा स्पष्ट आराखडा जाहीर केला आहे. या बैठकीत मुख्यत्वे पाच अत्यंत संवेदनशील मुद्द्यांवर विरोधी पक्षांचे एकमत झाले आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाचा आणि देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असलेला मुद्दा म्हणजे पेपरफुटी प्रकरण. 'नीट' आणि 'सीबीएसई' परीक्षांमध्ये झालेल्या कथित गैरप्रकारामुळे लाखो तरुणांच्या भविष्याशी आणि विश्वासाशी खेळ झाला असून, याला संपूर्णपणे देशाचे शिक्षणमंत्रीच जबाबदार असल्याचा थेट आरोप विरोधकांनी केला आहे. याच कारणामुळे सर्व पक्षांनी एकमुखाने केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या तातडीच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. याशिवाय निवडणूक प्रक्रियेतील त्रुटी, मतांची लूट आणि संभाव्य गैरप्रकारांबाबत भारताच्या सरन्यायाधीशांना अधिकृत पत्र पाठवण्याचा निर्णय घेऊन विरोधकांनी थेट न्यायव्यवस्थेकडे दाद मागण्याची तयारी सुरू केली आहे. देशातील ढासळती आर्थिक परिस्थिती, वाढती बेरोजगारी, गगनाला भिडलेली महागाई आणि शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न यांवर केवळ संसदेत चर्चा न करता, केंद्र सरकारने तातडीने स्वतंत्र सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी आग्रही मागणी 'इंडिया' आघाडीने केली आहे. यावरून विरोधक आता केवळ राजकीय मुद्द्यांवरच नाही, तर थेट जनतेच्या आणि जगण्याच्या प्रश्नांवरून सरकारला कोंडीत पकडणार असल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे, विरोधी पक्षांमधील हा ताळमेळ केवळ एका बैठकीपुरता मर्यादित राहू नये, यासाठी संसदेच्या आगामी अधिवेशनादरम्यान विरोधी पक्षनेत्यांच्या अध्यक्षतेखाली दररोज सकाळी समन्वय बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तसेच आघाडीची पुढील बैठक हैदराबाद येथे घेण्याचे ठरवून दर दोन महिन्यांनी नियमितपणे भेटण्याची नियमावलीही त्यांनी तयार केली आहे. एकीकडे विरोधी पक्षांची ही एकजूट आकाराला येत असताना, दुसरीकडे तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडण्याच्या आणि त्यांचे काही खासदार 'नॉट रीचेबल' असल्याच्या चर्चांनी राजकीय वर्तुळात मोठी खळबळजनक परिस्थिती निर्माण केली आहे. तसेच एआईडीएमके आणि आम आदमी पार्टी या दोन प्रमुख पक्षांनी या बैठकीकडे फिरवलेली पाठ विरोधकांच्या एकजुटीतील अंतर्गत आव्हानांकडे बोट दाखवते. लोकशाहीत सक्षम विरोधी पक्ष असणे ही काळाची गरज आहे, त्यामुळे या पाच मुद्द्यांवर आधारित असलेला विरोधकांचा हा नवा प्लॅन सरकारला किती आत्मपरीक्षण करायला लावतो आणि तृणमूल काँग्रेसमधील संभाव्य अंतर्गत पेचप्रसंगाचा या आघाडीवर काय परिणाम होतो, हे पाहणे आगामी काळात महत्त्वाचे ठरेल.

# आपल्यातील बेकी राष्ट्रासाठी घातकच.!

परस्पर विरोधेतू वयंम पंचश्च ते शतम्।
परेतू विग्रहे प्राप्ते वयंपंचाधिकं शतम्॥

महाभारतातील एक सुभाषित आहे, त्याचा अर्थ असा आहे, जेंव्हा संघर्ष आपल्यातल्या आपल्यात असतो तेव्हा आपण आपलेच असतो, पण जेव्हा बाहेरील व्यक्ती आपल्याला आपल्यावर आक्रमण करेल तेव्हा आपण सर्व एकूण एक एकत्र असावे. शब्दशः जरी नसेल तर सरळ याचा अर्थ असाच होतो. आपण इतिहास विसरतो हे आपले दुःख आहे. आणि इतिहासावर जगता येत नाही इतिहास निर्माण करावा लागतो हे खरं आहे. पण इतिहास विसरून इतिहास निर्माण होत नाही हेही तितकेच खरे आहे. आज घडीला आपण सर्वांनी राष्ट्र म्हणून एकत्र राहणे गरजेचे आहे आपल्यातील मतभेद आपल्या पुरते मर्यादित ठेवून आपण त्याला राष्ट्रहितासाठी बाजूला ठेवणे कधीही चांगले आहे. असं आजची स्थिती पाहता लक्षात येतं. विषय राजकारणा पुरता मर्यादित नाही. त्या एकीमध्ये राजकारण, समाजकारण, अर्थकारण, आध्यात्मिक विषय, सर्व आले. आपली सर्व क्षेत्रातील एकी आपले राष्ट्र अधिक शक्तिशाली करेल. आपण परकीय सत्तेला कधीच भीक घातली नाही. प्रत्येक वेळी आपण आपल्यातील एकी दाखवून त्याला धूळ चारली. पण जेव्हा जेंव्हा आपण आपल्याशीच लढत राहिलो तेव्हा तेंव्हा परकीय शत्रू हा आपल्यावर अधिक हावी झाला. आपल्या आपल्यात मतभेद असल्याने शत्रू बळकट झाला. हा इतिहास आहे, आणि सध्याच्या स्थितीत तर ह्या देशात मागच्या काही काळात बुद्धिजीवी मंडळींनी इथली श्रद्धा संपविण्यात आपले महत्वपूर्ण योगदान दिले आहे, आणि कम्यूनिष्ट तथा साम्यवादी मंडळींनी ह्या इथले देवस्थानं संपविण्या बरोबरच राष्ट्रभक्तीला देखील तिलांजली देण्यात योगदान दिलं आहे. भारतातील ह्या दोन मोठ्या प्रादुर्भावामुळे इथला तरुण, ना श्रद्धावान राहिला ना त्याला ईश्वरी शक्तीवर विश्वास राहिला, ना त्याला राष्ट्रबद्दल सोयर सुतक राहिलं आहे. तरुण मंडळी आपल्या भौतिक सुखाच्या मस्तीत धुंद आहे. त्यात आजही राष्ट्रीय प्रिंट मीडिया आणि राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स मीडिया ही सत्तर टक्के पेक्षा जास्त आजही त्यांच्यात हातात असल्याने त्यांचा प्रभाव अजूनही दिसतो आहे. भारताच्या क्षमता संपन्न इतिहासाला देखील ह्या मंडळींनी ग्रहण लावले आहे, हे आव्हान प्रचंड मोठे आहे हे लक्षात घेतलं पाहिजे. आपण आपल्या इतिहासावर एक नजर टाकली तर आपला इतिहास आपल्या नेहमी राष्ट्रभक्तीची प्रेरणा देत असतो. आपण कधीच इतरांवर संधान केले नाही, आपण तशा दृष्टीने जगाचा विचार केला. एकेकाळी सुवर्ण संपन्न आणि संस्कृती संपन्न आपला देश आपल्यातील नंतरच्या बेकी मुळे तुटत गेला. आपल्यातील बेकि आपल्याच हानी पोचवत आहे आणि पश्चिमी राष्ट्रांनी ह्याचा कायम फायदा करून घेतला आहे. भारताचा इतिहास शक्ती संपन्न आहे, आपण जो पर्यंत एकत्र होतो तो पर्यंत आपल्यावर कोणीही हावी होत नव्हतं पण जेव्हा आपण आपल्याच पासून दूर होत गेलो तेंव्हा पासून आपण तुटत गेलो...

भारतावर पहिले विदेशी पाऊल ख्रिस्तपूर्व 327 वर्षांपूर्वी अलेक्झांडरच्या रुपाने आले होते. खूप स्वप्न त्यांनी पाहिले होते. पण अवघ्या तीनच वर्षांत त्याला भारताच्या एकीमुळे अपमानजनक पराभव स्वीकारावा लागला. आणि भारताचा विजय झाला. तिथून पुढे अवघ्या सात वर्षांत चाणक्य चंद्रगुप्त ह्यांनी हा देश एकसंध केला की पुढचे काही शतके ह्या देशाकडे कोणी वाकडी नजर करून पाहले नाही. चाणक्याने आपल्याला अर्थशास्त्र दिलं, युद्धनीती दिली, कायदे दिले, राष्ट्रीय आणि परराष्ट्रीय धोरण दिलं त्यामुळे आपण अधिक संपन्न झालो. पण यानंतर कुशानांची टोळी आली तिने खूप प्रयत्न केले भारताला तोडण्याचे पण तसे न होता ती टोळी देखील लवकरच भारताच्या प्रेमात पडली. इतकच नाही तर कुशानांचा राजा कनिष्क, तर बुद्धाच्या प्रेमात पडला आणि अनुयायी बनला. त्या कनिष्कचा दुसरा सम्राट अशोक समजल्या जाऊ लागले. त्याने बुद्ध स्वीकारला आणि ह्या देशात शांतीला नवा मार्ग दिला. त्यानंतर शक (पहिले शतक) आणि हून (पाचवे शतक) या टोळ्यांनी हिंदुस्थानवर खोलवर जखमा केल्या. त्या जखमा अधिक तीव्र होत्या, त्यांनी भारताची एकी उद्ध्वस्त करायला सुरुवात केली होती. त्या नंतर पूर्वउत्तर भारत काही काळ महीर्गुला आणि तोर्मनच्या अधिपत्याखाली चिरडला गेला. तो ही इतका चिरडल्या गेला की भारत परत उठेल असं वाटतं नव्हत, पण पुढे राजा हर्षवर्धन, राजायशोवर्धन, राजा विक्रमादित्य, राजा शालिवाहन, हे जन्माला आले आणि भारतात भगवा परत सन्मानाने डोलायला लागला. त्याच भगव्याच्या पावनतेने परत भारत सुजलाम सुफलाम झाला, ते भगवा डोलत असतांनाच शक आणि हून सुद्धा भारताच्या प्रेमात पडले आणि भारताच्या संस्कृतीत रममाण झाले...

ख्रिस्तोत्तर सातव्या शतकात मुस्लिम टोळ्या यायला सुरुवात झाली आणि भारताची खरी दुर्गती इथून व्हायला सुरू झाली पण तरीही भारतीयांनी त्यांनाही सहजच काही प्राप्त होऊ शकले नाही, किंवा होऊ दिले नाही, त्याचे कारण भारत एकसंध होता. आपण परकियांना स्थान देऊ नये, आणि परकियांना सहकार्य करू नये ही भावना भारतीयांची जिवंत होती. पण पुढे त्यांनी विशेष गती ही मोहम्मद गजनी (अकरावे शतक, अफगानातून आलेला हा गजनी ह्याला अफगाणिस्तानच्या इतिहासात कवडीची ही किंमत नाही.) आणि मोहम्मद घोरी (बारावी शतक) यांच्या रूपाने गती मिळाली. ती गती त्यांनी मिळवत असताना भारतातील काहिं शक्तिंना हाताशी धरलं आणि आपला संचार आनिर्बंध सुरू ठेवला. पुढे तुर्की, अरब, अहिराणी, मोगल, अफगान, यांच्या आक्रमणांनी ह्या राष्ट्राची मृत्यू, विध्वंस,भ्रष्टाचार, यांची कृरकहानी साकारली होतीच. पण याला देखील आठशे वर्षे याच राष्ट्राने एकीने लढा दिला. एखाद्या राष्ट्राला ईतका दिर्घकाळ लढा दिला. जगाच्या पाठीवर ईतर कोणत्याही राष्ट्राने हा दिर्घकाळ लढा दिला नाही तो आपल्या भारताने दिला. भारत नेहमीच लढत राहिला मधल्या काळात परकियांशी आणि सध्याच्या काळात स्वकियांशी. राजस्थानात महाराणा कुंभा पासून ते महाराणा प्रतापसिंग ते पुढे राजासिंह पर्यंत. महाराष्ट्रात छत्रपती शिवराय पासून ते पेशवे पुढे अहिल्यादेवी होळकर पर्यंत. पंजाबात गुरुगोविंद सिंग ते बंदा बैरागी आणि रनजीत सिंहा पर्यंत सर्व शिख गुरु. सर्व बुंदेलखंडात छत्रसाल पासून ते आसामच्या लाचित बारफुकन पर्यंत. या सर्वांनी इस्लामी लढ्याचे वारु रोखले. आणि इस्लामची विजयी तलवार धुळीला मिळाली. परत ह्या राष्ट्रात भगवा अभीमानाने फडकला...

हे सर्व होते न होतो तोच या देशात धुर्त आणि कपटी चालबाज इंग्रजांनी ह्या राष्ट्रात पाय रोवले.. पण त्यांनाही 1857 च्या एकत्रित संग्रामाने आपन फार काळ टिकनार नाही, याची भनक लागली. पण इंग्रजानी आपली कमजोरी ओळखली होती. आपल्यातल्या आपल्यात त्यांनी वाद लावायला सुरुवात केली आणि त्यांना त्यात बरेच यश आले. आपल्यातले अनेक नेते त्याच्या गळाला लागले होते. काँग्रेसचे तर जवळजवळ बहुतांश नेते (राजकीय दृष्ट्या) खुशामतखोर निघाले. तरी देखील पंजाबात स्वामी दयानंद ह्यांनी आर्य समाजाद्वारे राष्ट्र प्रेमाची फुंकर घातली. सांस्कृतिक समाजात संस्कृती रुजवण्याचे काम रामकृष्ण परमहंस, स्वामी रामतीर्थ, योगी अरविंद, यांनी आध्यात्मिक साधना राष्ट्रभक्ती द्वारे चेतवली. त्याच द्वारे तरुणांना स्पुरन मिळत गेले. बंकिमचंद्र चॅटर्जी ह्यांनी वंदे मातरम् ह्या गिता द्वारे राष्ट्रभक्तीची फुंकर भारतीय तरुणांत घातली. त्याचीच प्रेरणा घेऊन कित्तेक तरुण राष्ट्रासाठी पुढे आले, आपले सर्वस्वाच त्याग देखील त्यांनी केला. राजाराम मोहनरॉय यांनी सामाजिक वाद बंद करण्याचे कसोशीने प्रयत्न केले. महादेव गोविंद रानडे यांनी प्रार्थना समाजाद्वारे, तर महात्मा फुले आणि आगरकर, सावरकर यांच्यासारख्याने देशासाठी सामाजिक अभिसरण रुजवले. भाषा, प्रांत, लिंग, जात, विचार. भेद हे सर्व दूर सारून लोकमान्य टिळक. पंडित नेहरू, महात्मा फुले, महात्मा गांधी, सुभाष बाबू, स्वातंत्र्यवीर सावरकर, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, चंद्रा चॅटर्जी, अरविंद घोष, बिपिन चंद्र पाल, आद्य सरसंघचालक डॉक्टर के.बी. हेडगेवार, दुसरे सरसंघचालक गोळवलकर गुरुजी, डॉक्टर बाबासाहेब भीमराव आंबेडकर, या सर्वांनी आपले वैचारिक मतभेद विसरून राष्ट्रासाठी एकत्र आले. पण अतिशय दुर्दैवाने सांगावसं वाटतं की जे परकीय शक्तींना भारत फोडन्याच काम जमलं नाही, ते आपल्यातील गद्दारांनी वा आपल्यातीलच विसंवादाने केलं. आणि आपण आपल्यातून बाजूला झाल्याने ह्या राष्ट्राची दुर्दैवी फाळणी झाली. हे आपलं दुर्दैव आहेच पण हे आपल्यामुळेच झाले असे म्हणायला पुष्कळ वाव आहे, तोच दोष आपल्यातील बेकीचा. आज जर देशाला लागला तरी हा दोष नक्की परवडणारा नाही हे लक्षात घेतल पाहिजे. हजारो वर्षाच्या भारताच्या इतिहासात स्वकियांमुळे जशी फाळणी झाली ती बाब लक्षात घेऊन आपण एकत्र राहणे गरजेचे आहे. हेच आजचा इतिहास आपल्याला शिकवतो. आपली बेकी झाली की फाळणी होते हेही लक्षात घेतलं पाहिजे. अलीकडच्या हजार वर्षात आपल्या देशाच्या बहुतांश भागावर प्रारंभी मुस्लिम. आणि नंतर ब्रिटिशांनी राज्य केल. परंतु आपण एकत्र असल्यामुळे किमानपक्षी तात्विक दृष्ट्या तरी आपण या परकीय राजकर्त्यांशी मातृभूमीच्या सार्वभौमत्व विषयी तडजोड केली नाही. आपण एकत्र असल्याने हे सर्व आक्रमण आपण पळून लावले. स्वकियांच्या मुळे, स्वकियांच्याच आग्रहाखातर देश तुटला. इतरांना दोष देण्यात धन्यता मानल्या पेक्षा आपणच एकत्र राहने हे नेहमीच चांगले आहे. वरिल ह्या आपल्या दैदिप्यमान इतिहासातुन आपण हेच शिकले पाहिजे. भारतातील काही तत्त्ववेत्त्यांनी मग ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक गोळवलकर गुरुजी असोत, की पूजनीय डॉ बाबासाहेब भीमराव आंबेडकर असोत, की स्वातंत्र्यवीर सावरकर असोत, ह्यांनी दूरदृष्टी केंव्हाच दिली होती. ह्या भारताला पुढे विदेशी आक्रांतापेक्षा, स्वदेशी महत्वकांक्षी लोकांचा त्रास होईल आणि तेच मधल्या दीडशे वर्षांत झालं.

राजकारण शाश्वत झाला आहे. ते नेहमी चालू राहणार आहे. राज्याचा प्रश्न आला की आपण महाराष्ट्रधर्मी असले पाहिजे. पण हे तितकच खर आहे की आपण प्रथम राष्ट्रधर्मी असावं. कुणाचा द्वेष वा तिरस्कार करन्याचा प्रश्न नाही, प्रश्न आहे इतिहासातून सत्य स्विकारन्याचा. मला माहित आहे इतिहासावर जगता येत नाही, पण ज्यांनी ज्यांनी इतिहास विसरला त्यांनी आपला भूगोल बदलवला.. ह्या भारत राष्ट्राचा इतिहास दैदिप्यमान आहे. ह्याच राष्ट्राने जगाला मार्गदर्शक केले आहे. मागे स्वातंत्र्याच्या अमृतमोहोत्सवाच्या वर्षीही जगाने ह्या राष्ट्राची दखल घेतली आहे. आम्ही राजकारनात सुद्धा 1990 च्या जिनिवाच्या संयुक्तराष्ट्रसंघाच्या अधिवेशनाच्या निमीत्तान आणि विरोधिपक्षनेते अटल बिहारी वाजपेयी च्या नेतृत्वाने आपली एकी दाखवलीच होती. आजही मोदी जगाच प्रतिनीधीत्व करतील असी स्थिती आहे. तेंव्हा आम्ही आपल्यातले शुल्लक मतभेद विसरुन राष्ट्रप्रथम साठी एकत्र यायला काहीही हरकत नाही, पण आपले काही राजकारणी भारताच्या बाबतीत भारताच्या बाहेर जाऊन, भारताची बदनामी करत आपला अजेंडा राबवतांना दिसतात. हे राष्ट्रासाठी सदैव हानिकारक आहे. मधात सर्वपक्षीय खासदारांचे एक शिष्टमंडळ जगात भारताची बाजू मांडून आले, त्याचा मोठा प्रभाव जगावर भारताच्या एकीचा पडला. आणि जगाने विशेष त्या विषयाची दखल घेतली. हीच दखल जग घेत राहील असं जर भारतीय म्हणून आपल्याला वाटत असेल तर आपल एक असणं अत्यंत महत्वाचं आहे. कारण आपली एकी हीच आपली शक्ती आहे आणि आपली बेकी हीच आपली अधोगती आहे हे लक्षात ठेवावं... तुर्तास्त इतकंच...

**- विशाल वसंतराव मुळे आजेगावकर.** ■

## उद्योजक घनश्यामदास गोयल यांची अग्रवाल संमेलनाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड

**जालना (प्रतिनिधी) :** जालना शहर, जिल्हा आणि पर्यायाने संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानास्पद बातमी आहे. देशभरातील तब्बल ४ कोटी लोकसंख्या असलेल्या अग्रवाल समाजाचे राष्ट्रीय नेतृत्व करण्याची ऐतिहासिक जबाबदारी आता जालन्याला मिळाली आहे. जालन्यातील प्रसिद्ध स्टील उद्योजक, अग्रगण्य सामाजिक कार्यकर्ते आणि दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित असलेले 'कालिका स्टील'चे संचालक घनश्यामदास गोयल यांची अखिल भारतीय अग्रवाल संमेलनाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या बहुमानामुळे जालन्याचे नाव आता देशाच्या औद्योगिक आणि सामाजिक नकाशावर अधिक ठळकपणे पोहोचणार आहे.

अखिल भारतीय अग्रवाल संमेलनाचे राष्ट्रीय अध्यक्ष वसंत मित्तल आणि महासचिव गोपाल गोयल यांनी श्री. गोयल यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली असून, या निवडीमुळे जालना जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. भारतात अग्रवाल समाजाची लोकसंख्या मोठी असून, जालन्यात या समाजाची सुमारे १ हजार घरे आणि ५,००ी च्या आसपास लोकसंख्या आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने हा आकडा मर्यादित वाटत असला, तरी जालन्याच्या आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीत या समाजाचा वाटा सिंहाचा आहे. विशेषतः जालन्याची ओळख असलेल्या स्टील उद्योगात सुमारे ७५ ते ८० टक्के वर्चस्व याच समाजाचे आहे. पूर्वी केवळ व्यापार आणि उद्योगापुरताच मर्यादित असलेल्या अग्रवाल समाजाने आता शिक्षण आणि प्रशासकीय सेवेतही मोठी झेप घेतली आहे. सध्या महाराष्ट्रात अनेक उच्चपदस्थ शासकीय अधिकारी म्हणून या समाजातील तरुण यशस्वीपणे जबाबदारी सांभाळत आहेत, यावरही या निमित्ताने प्रकाश टाकण्यात आला.



### समाजाची उन्नती म्हणजेच देशाचा विकास: घनश्यामदास गोयल

**आपल्या या नियुक्तीनंतर भावना व्यक्त करताना नवनियुक्त राष्ट्रीय उपाध्यक्ष घनश्यामदास गोयल म्हणाले की, "आतापर्यंत आपण सर्वच समाजघटकांना सोबत घेऊन सामाजिक कार्य करत आलो आहोत. मात्र, आता राष्ट्रीय स्तरावरील मोठी जबाबदारी मिळाल्यामुळे अग्रवाल समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक गतीने काम करावे लागणार आहे. हा समाज मुख्यत्वे उद्योजक आणि व्यापारी असल्याने, जेव्हा या समाजाची प्रगती होते, तेव्हा देशाची आर्थिक घडी मजबूत होते. समाजाच्या भरभराटीतूनच इतर सर्व समाजघटकांना रोजगार, व्यवसाय आणि नोकरीच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत."**

**घनश्यामदास गोयल यांच्या या निवडीबद्दल जालन्यातील उद्योग जगतातून, राजकीय नेत्यांकडून आणि विविध सामाजिक संघटनांच्या वतीने त्यांचे जोरदार स्वागत केले जात असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

## छत्रपती संभाजीनगरमध्ये 10 जून रोजी 'ट्राय'तर्फे विशेष ग्राहक जनजागृती कार्यशाळा

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणातर्फे (TRAI) आगामी बुधवार, दिनांक १० जून रोजी कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (CII) च्या सदस्यांसाठी एका विशेष ग्राहक जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा सायंकाळी ६.०० वाजता हॉटेल अतिथी (पी-३, जालना रोड, सेव्हन हिल्स, टाऊन सेंटर, छत्रपती संभाजीनगर) येथे पार पडणार असल्याची माहिती 'ट्राय'च्या बेंगळुरू प्रादेशिक कार्यालयाचे के. मुरलीधरा यांनी दिली आहे. उद्योजक आणि कॉर्पोरेट क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम 'ट्राय' (TRAI) ही देशातील दूरसंचार व प्रसारण सेवांचे नियमन करणारी १९९७ मध्ये स्थापन झालेली वैधानिक संस्था आहे. ग्राहकांच्या हितांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी 'ट्राय'तर्फे देशभरात नियमितपणे ग्राहक संपर्क कार्यक्रम (CoPs) राबवले जातात. आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या 'CII' परिसंस्थेतील उद्योगपती, व्यावसायिक नेते आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील तज्ज्ञांपर्यंत डिजिटल साक्षरता व सुरक्षिततेचा संदेश पोहोचवणे हा या संयुक्त कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे. या माध्यमातून उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींना प्रशिक्षित केले जाईल, जेणेकरून हा संदेश त्यांच्या कर्मचारीवर्गासह संपूर्ण समाजापर्यंत पोहोचू शकेल.

या कार्यशाळेत उपस्थित तज्ज्ञांकडून मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. दूरसंचार व ग्राहकांचे हक्क. ग्राहकांचे कायदेशीर हक्क, दूरसंचार सुविधा आणि सेवा गुणवत्तेची (QoS) मानके. तक्रार निवारण. सेवांबाबत तक्रार नोंदवण्याची आणि त्याचे निवारण करण्याची अधिकृत यंत्रणा.डिजिटल सुरक्षा व सायबर गुन्हे प्रतिबंध. दूरसंचार नेटवर्कचा सुरक्षित वापर, सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण आणि नियामकांनी ठरवून दिलेल्या नियमावलीची ("काय करावे आणि काय करू नये" - Do's & Don'ts) सविस्तर माहिती. या कार्यशाळेच्या अधिक माहितीसाठी नागरिकांनी व इच्छुकांनी 'ट्राय'चे प्रादेशिक कार्यालय, बेंगळुरू येथील प्रतिनिधी के. मुरलीधरा यांच्याशी ९४४९००५५८८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा sro2.bengaluru@trai.gov.in या ई-मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शिवराज्यभिषेक सोहळयातून लोकशाहीची पायाभरणी

### इतिहास अभ्यासक रवींद्र पाटील यांचे प्रतिपादन



**छत्रपती संभाजीनगर, :** शिवराज्याभिषेक सोहळा ही ख-या अर्थाने रयतेच्या राज्याची व भारतीय लोकशाहीची पायाभरणी आहे, असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक रवींद्र पाटील यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्यावतीने शिवराज्यभिषेक दिनानिमित्त शिवचरित्राचे अभ्यासक रविंद्र तुकाराम पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राच्यावतीने हा कार्यक्रम झाला. यावेळी जळगांव येथील अभ्यासक रविंद्र पाटील हे 'छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श राज्य' या विषयावर मार्गदर्शन केले. कुलगुरु डॉ.विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते. अध्यासन केंद्र संचालक डॉ.पुरुषोत्तम देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेही रविंद्र पाटील म्हणाले, यावेळी रवींद्र पाटील म्हणाले, छत्रपतीच्या. इतिहास हा जसा पराक्रमाचा आहे तसा तो व्यवस्थापनाचा आणि नियोजनाचा देखील आहे. एखादा गुन्हा झाला तर आपल्या नातेवाईकांना देखील शिक्षा देण्यास मागे पुढे न पाहणारा राजा म्हणून शिवाजी महाराजांची ओळख आहे. स्त्रीदक्षिन्याचा महामेरू असलेल्या शिवरायांच्या कार्यकाळात महिलांना सन्मानाची वागणूक मिळत होती. शिवशाहीत शेतकऱ्याची आत्महत्या नव्हती कारण शेतकरी हा समृद्ध व्हावा ही शिवरायाची इच्छा होती. रायगडाचा राज्याभिषेक हा सार्वभौम राज्याभिषेक होता त्यात भाषा, कायदा, न्यायव्यवस्था, चलन आणि सुरक्षा हे सगळ राजानी निर्माण केले. राजांनी आम्हाला माणसं जमवायला आणि जपायला शिकवलं आणि जमवलेल्या मावळ्यांना एका विशिष्ट ध्येयानी प्रेरित करून देव देश आणि न्यायासाठी मारायला आणि मरायला शिकवले, असेही ते म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य हे जगातील सर्वोत्कृष्ट रयतेचे राज्य होते, असे अध्यक्षीय समारोपात कुलगुरु डॉ.विजय फुलारी म्हणाले. संचालक डॉ.पुरुषोत्तम देशमुख यांनी प्रास्ताविक केले. कुलदीप चव्हाण यांनी सूत्रसंचालन तर पृथ्वीराज कोल्हे यांनी आभार मानले.

## समुपदेशनाद्वारे आरोग्य विभागातील 4,193 कर्मचाऱ्यांच्या पारदर्शक बदल्या

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

मुंबई/ सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदली प्रक्रियेत यंदा प्रथमच समुपदेशनाधारित, पारदर्शक आणि तंत्रशुद्ध पद्धतीचा अवलंब करण्यात आला. राज्यातील एकूण ४,५०६ बदलीपात्र कर्मचाऱ्यांपैकी ४,१९३ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी शिफारसी करण्यात आल्याने ही प्रक्रिया राज्य प्रशासनातील एक आदर्श उपक्रम ठरली आहे.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या प्रक्रियेत कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता, पसंतीक्रम, दुर्गम भागातील सेवा, वैद्यकीय तसेच कौटुंबिक परिस्थिती यांचा विचार करण्यात आला. त्यामुळे राज्यभरातील कर्मचाऱ्यांमध्ये विश्वास, समाधान आणि सकारात्मकतेचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले.



आरोग्य विभागाचे प्रधान सचिव, सचिव-२ आणि आयुक्त आरोग्य सेवा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संचालक आरोग्य सेवा (प्राथमिक) यांच्या प्रशासकीय नियोजनातून संपूर्ण प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. प्रत्येक परिमंडळासाठी स्वतंत्र वेळापत्रक, मार्गदर्शक सूचना, व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, हरकतींचे तत्काळ निवारण आणि प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरण यामुळे पारदर्शकता व विश्वासार्हता सुनिश्चित करण्यात यश आले.

परिमंडळ कार्यक्रम प्रमुख आणि राज्यस्तरीय कार्यक्रम प्रमुख यांच्या उपस्थितीत समन्वयाने बदल्या करण्यात आल्या. छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अकोला, नाशिक, कोल्हापूर, पुणे, लातूर आणि ठाणे या परिमंडळांसह विविध विशेष आरोग्य संस्थांमध्ये १३ ते २३ मे २०२६ या कालावधीत समुपदेशन प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. सर्व परिमंडळांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदली शिफारसी करण्यात आल्या असून प्रक्रिया सुरळीत आणि वादविरहित राहिली.

समुपदेशनाद्वारे परिचारिका संवर्गातील १,५७५, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) संवर्गातील ८०८, कनिष्ठ लिपिक संवर्गातील १९७, औषध निर्माण अधिकारी संवर्गातील १६० आणि प्रयोगशाळा सहाय्यक संवर्गातील १४९ कर्मचाऱ्यांच्या बदल्या निश्चित करण्यात आल्या. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पारदर्शकतेच्या मागणीला या प्रक्रियेमुळे सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे कर्मचारी संघटनांनी नमूद केले आहे.

प्रक्रियेदरम्यान रिक्त पदांची आणि बदलीपात्र कर्मचाऱ्यांची यादी संकेतस्थळावर तसेच नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली. राज्यस्तरीय निरीक्षकांची नियुक्ती करून प्रत्येक टप्प्यावर देखरेख ठेवण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या प्रतिक्रिया विभागाच्या समाजमाध्यमांवरही प्रसिद्ध करण्यात आल्या. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या संभ्रमाला किंवा गैरसमजाला वाव न देता प्रक्रिया पूर्ण करण्यात यश मिळाले.

आरोग्य विभागातील अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ही प्रक्रिया 'विश्वास निर्माण करणारी आणि न्याय्य' असल्याची भावना व्यक्त केली आहे. शासनाच्या धोरणात्मक निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून सार्वजनिक आरोग्य विभागाने कार्यक्षम व्यवस्थापनाचा आदर्श निर्माण केल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागातील बदल्यांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि विश्वासार्हता आणण्यासाठी राबविण्यात आलेली ही समुपदेशन प्रक्रिया राज्य प्रशासनासाठी महत्त्वाचा मैलाचा दगड ठरत असून भविष्यातील कर्मचारी व्यवस्थापनासाठीही दिशादर्शक ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

यावर्षी बदली प्रक्रियेत कर्मचाऱ्यांचे सहकार्य आणि सकारात्मक प्रतिसाद लाभल्याने बदल्या अधिक नियोजनबद्ध व पारदर्शकपणे पूर्ण करता आल्या, अशी भावना संचालक, आरोग्य सेवा (प्राथमिक) डॉ. विजय कंदेवाड यांनी व्यक्त केली.

## पत्रकार सय्यद जमीर यांच्या कडून सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन इंगळे यांचा सत्कार

हिन्दू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**अजिंठा :** पोलीस स्टेशन येथे नव्याने सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) म्हणून रुजू झालेले श्री. पवनजी इंगळे यांची पत्रकार सय्यद जमीर यांच्या कडून सदिच्छा भेट घेऊन पुष्पगुच्छ प्रदान करत सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार सय्यद जमीर यांनी श्री. इंगळे यांचे अभिनंदन करून त्यांच्या नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या. अजिंठा परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून जनतेला न्याय देण्यासाठी त्यांचे कार्य प्रभावी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन इंगळे यांनी शुभेच्छांबद्दल आभार व्यक्त करत नागरिकांच्या सहकार्याने पोलीस प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी व सर्वसामान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याची ग्वाही दिली. या प्रसंगी झालेल्या सदिच्छा भेटीमुळे पोलीस प्रशासन व पत्रकारिता क्षेत्रातील समन्वय अधिक दृढ होण्यास मदत होईल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## आदित्य ठाकरे यांच्या जन्मदिनानिमित्त युवासेनेची विभागस्तरीय ‘सडेतोड वकृत्व स्पर्धा

**छत्रपती संभाजीनगर :** युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या जन्मदिनानिमित्त युवासेनेच्या वतीने विभागस्तरीय “सडेतोड वकृत्व स्पर्धा - 2026 चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा बुधवार, दि. 10 जून 2026 रोजी सकाळी 10 वाजता शिवाई ट्रस्ट, शिवसेना भवन, संभाजीपेठ, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

18 ते 35 वर्षे वयोगटातील युवक-युवतींसाठी आयोजित या स्पर्धेचा विषय “माझा महाराष्ट्र, माझी जबाबदारी” असून “२१व्या शतकातील मराठी अस्मिता - आव्हाने आणि संधी” या विषयावर स्पर्धकांना आपले विचार मांडता येणार आहेत. प्रत्येक स्पर्धकाला 10 मिनिटांचा कालावधी देण्यात येणार असून प्रवेश विनामूल्य आहे.

स्पर्धेत प्रथम पारितोषिक रुपये 5001/- व द्वितीय पारितोषिक रुपये 3001/- असे ठेवण्यात आले आहे.

# क्षेत्र वेरूळ येथील मालोजीराजे भोसले गढीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावी : राजेंद्र पवार

**खुलताबाद प्रतिनिधी :** श्री क्षेत्र वेरूळ येथील शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी आलेल्या मान्यवरांकडे प्रामुख्याने राजेंद्र पवार यांच्या वतीने घडीच्या सर्वांगीण विकासासाठी आलेल्या मंत्री महोदयासह सर्व प्रमुख मान्यवरांना लेखी स्वरुपात निवेदन देऊन उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्याचे ओबीसी कल्याण मंत्री अतुल मोरेश्वर सावे जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे खासदार संदिपान भुमरे जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील संभाजीनगर शहराचे महापौर समीर राजूरकर जिल्हा परिषद सदस्य कुणाल दांडगे छत्रपती संभाजी नगर भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे सरपंच प्रकाश पाटील मिसाळ यांची उपस्थिती होती



महाराष्ट्रातील सर्व शिवभक्ताच्या वतीने स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी लिखित स्वरूपामध्ये निवेदन दिले आहे की या ऐतिहासिक जागेचा विकास होण्यासाठी मुख्यमंत्री महोदय कडे बैठक लावावी मालोजीराजे भोसले गडीच्या संदर्भात चार प्रमुख मागण्या यावेळी केले असून या जागेचं महत्त्व फक्त स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची जन्मभूमी असल्यामुळे पितृ तीर्थ म्हणून या घडीला घोषित करावे दुसरी मागणी जागतिक दर्जाचे स्मारक होण्यासाठी ४०० ते ५०० कोटी रुपये तरतूद करून या पवित्र पावन भूमीचा विकास करावा तिसरी प्रमुख मागणी सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्गाला स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले महामार्ग असे नाव देण्यात यावे कारण याच मार्गाने शहाजीराजे भोसले कर्नाटक येथे गेले असून त्यांची समाधी उदगिरी कर्नाटक येथे आहे चौथी मागणी वेरूळ येथील मुख्य चौक मालोजीराजे भोसले यांच्या नावाने असून कुंभमेळा च्या अगोदर या चौकाचे शुभिकरण होणे गरजेचे आहे कारण भारतभरातून कुंभमेळ्याच्या पर्वकाळावर करोडो लोक वेगवेगळ्या शहरातून येतील त्यांच्यापर्यंत हा इतिहास योग्य पद्धतीने जाईल या सर्व बाबींचा विचार करून मागण्या मंत्री अतुल मोरेश्वर सावे व पालकमंत्री संजयजी शिरसाट यांच्याकडे केल्या असून दोन्ही मान्यवरांनी या संदर्भात लवकरच मुख्यमंत्री महोदयांची बैठक लावून असे आश्वासन हजारो शिवभक्तांना शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने शुभेच्छा पर भाषणामध्ये आश्वासित केले

प्रतिष्ठानच्या वतीने विविध उपक्रम स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांच्या चरणापाशी वर्षभरात राबवली जातात अध्यक्ष राजेंद्र पवार यांच्यावतीने राबवले जातात याबद्दल राज्याचे ओबीसी कल्याण मंत्री अतुल मोरेश्वर सावे पालकमंत्री संजयजी शिरसाठ खासदार संदिपान भुमरे पाटील यांनी विशेष अभिनंदन केले

## लग्नाचा वाढदिवस ठरला 'काळा दिवस'; लाचखोर तहसीलदार विजय चव्हाणच्या घरात 'एसीबी'ची धडक, 9 जूनपर्यंत पोलीस कोठडी!

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी):** अवैध वाळू उपशासाठी तब्बल १२ लाखांची लाच मागणाऱ्या अंबडचा तहसीलदार विजय लक्ष्मण चव्हाण (वय ४७) याच्या अडचणीत प्रचंड वाढ झाली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चव्हाणच्या छत्रपती संभाजीनगरातील आलिशान बंगल्यावर टाकलेल्या छाप्यात रोख रकमेसह सोन्या-चांदीचे दागिने जप्त केले आहेत. न्यायालयाने आरोपी चव्हाणला ९ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून, आता त्याच्या संपूर्ण मालमत्तेची 'खुली चौकशी' केली जाणार आहे. कारवाईच्या दिवशी तहसीलदार चव्हाण याच्या लग्नाचा वाढदिवस होता. सातारा परिसरातील कासलीवाल मार्वल सोसायटीतील त्याच्या आलिशान बंगल्यावर नातेवाईक आणि मित्रमंडळी वाढदिवसाच्या सेलिब्रेशनसाठी जमले होते. घरात आनंदाचे वातावरण असताना आणि केक कापण्याची तयारी सुरू असतानाच 'एसीबी'च्या पथकाने घरात प्रवेश केला आणि थेट बेड्या ठोकल्या. यामुळे वाढदिवसाचा रंग विरघळला आणि कुटुंबावर मोठी नामुष्की ओढवली. लाचेचा 'रेट' आणि कारवाईची पार्श्वभूमी एका ३६ वर्षीय वाळू व्यावसायिकाने दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. चव्हाण याने अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाहनांवर कारवाई न करण्यासाठी अवाढव्य रक्कमेची मागणी केली होती.

### घरझडतीत काय काय सापडले?

**रविवारी सातारा पोलिसांत गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस निरीक्षक समाधान कवडे यांनी चव्हाणच्या बंगल्याची कसून झडती घेतली. या झडतीत खालील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

**रोख रक्कम: १ लाख ८ हजार ८०० रुपये, दागिने: ८.८ तोळे सोन्याचे आणि चांदीचे दागिने, इतर साहित्य : महागडी ८ मनगटी घड्याळे आणि लॅपटॉप, घरझडतीत अपेक्षेपेक्षा कमी मुद्देमाल हाती लागल्याने, चव्हाणने आपली काळी कमाई इतरत्र कुठेतरी गुंतवल्याचा 'एसीबी'ला संशय आहे. त्यामुळे त्याच्या आणि त्याच्या नातेवाईकांच्या नावे असलेल्या बेनामी मालमत्तेची आता उघड चौकशी केली जाईल.**

# सर्वाधिक काळ पंतप्रधान पदावर राहणारे नरेंद्र मोदी हे देशातील पहिले नेते

## 10 जून रोजी पंतप्रधान मोदी यांचे या पदावरचे आपले 4,399 दिवस पूर्ण



**लोकतांत्रिक पद्धतीने निवडून येऊन देशात सलग सर्वाधिक काळ पंतप्रधान पदावर राहणारे नरेंद्र मोदी हे देशातील पहिले नेते ठरले आहेत. आतापर्यंत हा पराक्रम केवळ पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नावावर नोंदवला गेला होता. नरेंद्र मोदी यांनी 26 मे 2014 रोजी पहिल्यांदा देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. तेव्हापासून आजतागायत ते या सर्वोच्च पदावर कायम असून, केंद्रामध्ये त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारने तब्बल 12 वर्षे पूर्ण केली आहेत. 10 जून रोजी पंतप्रधान मोदी हे या पदावर आपले 4,399 दिवस पूर्ण करतील; तर पंडित नेहरु हे सार्वत्रिक निवडणुकांनंतर या पदावर 4,398 दिवस राहिले होते.**

हार्दिक शुभेच्छा



# 26 बालकाची आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषधी वाटप



हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.८ जून :** तालुक्यातील दुर्गम भागातील रामपूर वाडी,न्हावी तांडा, निंबायती,पिंपरी,रामपूर तांडा येथील अंगणवाडी तील बालकाची आरोग्य तपासणी करून यातील २६ बालकांना मोफत औषधी वाटप करण्यात आली.

प्रकल्प कार्यालय व राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या आरोग्य तपासणी शिबिरात. पाच गावांतील अंगणवाडीतील बालकाची आरोग्य तपासणी करण्यात आली.या उपक्रमाचे संयोजक संजय शहापूरकर यांनी सांगितले की कुपोषण कमी करण्यासाठी अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन चे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी हा उपक्रम सुरू केला असून्य बालकांना मोफत औषधी वाटप करण्यात येते.

आज वैद्यकीय अधिकारी डॉ.खालिद झाकी व डॉ.पठाण यांनी बालकाची आरोग्य तपासणी केली.याप्रसंगी अंगणवाडी सेविका नंदाबाई दांडगे,वंदनाबाई चव्हाण, रंजना जाधव,मीरा मोरे यांच्यासह मदतनीस उपस्थित होते.

# प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाला 10 वर्षे पूर्ण; जिल्ह्यात विशेष आरोग्य शिबिरे व जनजागृती उपक्रम

## गर्भवती महिलांसाठी मोफत प्रसूतीपूर्व तपासणी, उच्च जोखीम गर्भधारणेची ओळख व तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाला (PMSMA) ९ जून २०२६ रोजी दहा वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात विविध आरोग्यविषयक उपक्रम व जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

९ जून २०१६ रोजी सुरू झालेल्या या अभियानांतर्गत गर्भधारणेच्या दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीतील महिलांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली मोफत, दर्जेदार आणि सर्वसमावेशक प्रसूतीपूर्व आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जाते. या अभियानामुळे उच्च जोखीम गर्भधारणांची वेळेवर ओळख, आवश्यक उपचार, संदर्भ सेवा व नियमित पाठपुरावा करणे सुलभ झाले असून मातृ व बाल आरोग्य सुधारण्यात मोठे योगदान मिळाले आहे.




"१० वर्षे PMSMA : सुरक्षित गर्भधारणा, निरोगी माता, सशक्त भारत" या संकल्पनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, समुदाय आरोग्य केंद्रे व प्रथम संदर्भ केंद्रांमध्ये विशेष PMSMA सत्रे घेण्यात येणार आहेत.

या सत्रांमध्ये गर्भवती महिलांची प्रसूतीपूर्व तपासणी, रक्त व मूत्र तपासण्या, समुपदेशन सुविधा तसेच उच्च जोखीम गर्भधारणांची ओळख, नोंदणी व नियमित पाठपुरावा करण्यात येणार आहे. आशा, एएनएम व आरोग्य कर्मचारी गावपातळीवर जनजागृती उपक्रम राबविणार असून माता बैठक, ग्रामसभा, जनआरोग्य समिती आणि बचत गटांच्या माध्यमातून समुदाय सहभाग वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.

जिल्ह्यातील सर्व पात्र गर्भवती महिलांनी या विशेष PMSMA सत्रांचा लाभ घेऊन नियमित प्रसूतीपूर्व तपासणी करून घ्यावी, असे आवाहन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर तथा जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे यांनी केले आहे.

"वेळेवर प्रसूतीपूर्व तपासणी – सुरक्षित मातृत्वाची खात्री!" असा संदेश यानिमित्ताने देण्यात आला आहे.

# वर्धापन दिन उत्साहात; शिवसेना पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

## आमदार प्रदीप जैस्वाल करणार मार्गदर्शन



छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) - ८ जून १९८५ रोजी मराठवाड्यात सर्वप्रथम स्थापन झालेल्या शिवसेना शाखेच्या ४१ वा वर्धापन दिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले होते. यामध्ये शिवसेना मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे मंगळवार, 9 जून रोजी सायंकाळी 5 वाजता शिवसेना पदाधिकारी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहेत. यावेळी आमदार प्रदीप जैस्वाल हे शिवसैनिकांना मार्गदर्शन करणार आहेत.

आमदार प्रदीप जैस्वाल यांचे संपर्क कार्यालय, नारळीबाग खडकेश्वर येथे होणाऱ्या मेळाव्यास सर्व आजी-माजी नगरसेवक, शिवसेना पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले.

नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणूकीची मरगळ झटकून पुन्हा नव्या दमाने कामाला लागावे. शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या छत्रपती संभाजीनगर शहरांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली ही बैठक होत आहेत.

# कॉम्रेड रनर्संना गुडलक रनद्वारे शुभेच्छा



**छत्रपती संभाजीनगर:** दक्षिण आफ्रिकेतील डर्बन येथे 14 जूनरोजी प्रतिष्ठित 90 किमी अंतर असलेली कॉम्रेड रन मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यात छत्रपती संभाजीनगर येथील नामवंत धावपटू तुषार प्रधान,संतोष कुलकर्णी,अमोघ जैन, सुधीर कुलकर्णी सहभागी होणार आहेत. या धावपटूंना शुभेच्छा देण्यासाठी सीडीसीए सायकलिंग संघटनेच्यावतीने शुभेच्छापर गुडलक रनचे आयोजन करण्यात आले.यावेळी छत्रपती संभाजीनगर ते रायगड अशी श्रीमंत छत्रपती शिवाजीमहाराज राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त मोहिम पूर्ण करणार्या सायकलपटूंचा सत्कारही करण्यात आला.या सायकलवारीतील सहभागी सदस्य हरिश्चंद्र मात्रे, विजय पाटोदी, शुभम इधाटे, दीपक इधाटे, सौरभ कर्डिले, पोपट आलंजकर, अनिल देशमुख, रोहिदास चोंधे पाटील, रवींद्र जोशी, पुण्यशील टेंभुरकर, बाळासाहेब भालेराव, यशोधन गाडेकर, आशीष असवर, विष्णु बैनाडे यांना गौरविण्यात आले.

याप्रसंगी डॉ. अजित घुले, निखिल कचेश्वर, चरणजितसिंग संघा, बालाजी नारागुडे, मनीष खंडेलवाल, अतुल जोशी, डॉ.दीपक कुंकुलोळ, राजकुमार मालानी, सतीश अन्वेकर आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांचे विविध मागण्यांसाठी निवेदन



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.८ जून :** फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर् सेल या मोबाईल ॲप्लिकेशनमुळे शेतकरी व कृषी सेवा केंद्र चालकांना होत असलेल्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर सोमवारी दुपारी एक वाजता संतप्त शेतकऱ्यांनी तहसीलदार मनीषा मेने यांना निवेदन सादर केले.सदर ॲप्लिकेशनचा वापर बंधनकारक करू नये तसेच सध्यातरी ते बंद करण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच पीक विम्यातील 'ट्रिगर' पूर्ववत लागू करण्याबाबत... सोयगावतील शेतकऱ्यांनी आंदोलनाचा तीव्र इशारा निवेदनात दिला खरीप हंगाम दारात उभा असताना शासन आणि प्रशासनाच्या जाचक धोरणांमुळे आमच्यावर शेती सोडून रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. आमचा संयम आता सुटला असून, शासनाने सुरू केलेले 'खत खरेदी ॲप' अत्यंत क्लिष्ट आणि डोकेदुखी ठरत आहे. फार्मर आयडी शोधणे, जमिनीनुसार मर्यादित खत नोंदणी आणि QR कोडची सक्ती यामुळे सामान्य शेतकरी कृषी केंद्रांवर चकरा मारून दमला आहे. सोयगाव तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन नाहीत, आणि ग्रामीण भागात इंटरनेट चालत नाही. खत वेळेवर न मिळाल्याने पेरणी बाजूला राहील आणि शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होईल. हे ॲप त्वरित बंद करून पूर्वीसारखीच खत विक्री सुरू करा. पीक विम्यातील 'ट्रिगर' पूर्ववत लागू करा या मागण्या साठी सोयगाव शहरातील शेतकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी निवेदन दिले.

# प्लास्टिकविरोधात भाजपाची जनजागृती मोहीम; हजारो नागरिकांना कापडी पिशव्यांचे वाटप

## जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या उपस्थितीत भाजीमंडईत पर्यावरण संवर्धनाचा संदेश




हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, प्लास्टिकमुक्त शहर आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी भारतीय जनता पार्टी पदमपुरा मंडळाच्या वतीने सोमवारी स्थानिक भाजीमंडई परिसरात मोठ्या प्रमाणात जनजागृती अभियान राबविण्यात आले. यावेळी नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करून प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले.

भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष किशोरदादा शितोळे यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या उपक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. बाजारपेठेत खरेदीसाठी आलेल्या नागरिकांना कापडी पिशव्या देत पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करण्याचा संदेश देण्यात आला.

यावेळी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, प्लास्टिक पिशव्यांमुळे पर्यावरणासह मानवी आरोग्यावरही गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने कापडी पिशव्यांचा वापर करून पर्यावरण रक्षणाच्या चळवळीत सहभागी व्हावे. स्वच्छ, हरित आणि प्लास्टिकमुक्त छत्रपती संभाजीनगर घडविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी शहराचे महापौर समीरदादा राजुरकर, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष किशोरदादा शितोळे, नगरसेवक दामुअण्णा शिंदे, पदमपुरा मंडळ अध्यक्ष मनदीप राजपूत, संजय बारवाल, संतोष बारवाल, निखिल तिवारी, संतोष मरमट, हर्षदा राजपूत यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ट्रॅक्टर थेट विहिरीत पडल्याने चालकाचा मृत्यू

हिंदू प्रकाश वार्ता, प्रतिनिधी.

**परभणी :** शेतात काम करत असताना ट्रॅक्टर थेट विहिरीत पडल्याने चालकाचा मृत्यू झाला आहे ही घटना सात जून रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास परभणी तालुक्यातील नरसापुर शेतशिवारात गट क्रमांक 108 मध्ये घडली या प्रकरणी परभणी ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे अधिक माहिती अशी की अचुत शिंदे यांनी फिर्याद दिली आहे बालासाहेब रामराव शिंदे वय 42 वर्षे असे मयताचे नाव असून चुलत भाऊ बाळू बालासाहेब शिंदे यांचे ट्रॅक्टर घेऊन स्वतःच्या शेतामध्ये काम करत होते अचानक त्यांचे ट्रॅक्टर शेतातील विहिरीमध्ये पडल्यामुळे यामध्ये बालासाहेब शिंदे यांचा मृत्यू झाला स्वतःच्या ताब्यातील ट्रॅक्टर हायगयी व ट्रॅक्टर चालऊन स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी संबंधितावर परभणी ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गडदे करत आहे.




**शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी 14 बहाद्दरांची मोहीम यशस्वी छत्रपती संभाजीनगर, :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५३ व्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त किल्ले रायगड येथे उपस्थित राहण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील १४ सायकलवीरांनी ४ जून रोजी सायकलवारीला सुरुवात केली. इतिहासप्रेम, पर्यावरण संवर्धन आणि शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश देणारी ही मोहीम अत्यंत उत्साहात पूर्ण झाली. पहिल्या

# तीन वर्षीय बालिकेचा भटक्या कुत्र्यांतोडले गालाचे व डोळ्याचे लचके

## गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी

**जिंतूर :** शहरातील बलसा रोडवरील परिसरातील जमीर कॉलनी येथे शनिवार 7 जून रोजी सायंकाळी सुमारे पाच वाजता भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात साडेती साडेतीन वर्षीय बालिका गंभीर स्वरूपात जखमी झाली ची घटना घडली. जखमी बालके वर जिंतूर ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले नंतर पुढील उपचारासाठी परभणी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार आलिशा फिरोज खान वय साडेतीन वर्ष ही बालिका घरासमोर खेळत असताना अचानक भटक्या कुत्र्याने तिच्यावर हल्लाबोल करत तोंडाजवळ कानाजवळ तिला गंभीर जखमी केले जखमा एवढ्या गंभीर स्वरूपाच्या होत्या त्यातून मोठ्या प्रमाणात त्रस्त सराव झाला एकूण परिसरातील नागरिक व युवकांनी तात्काळ कुत्र्याला हौसकावून लावले आणि जखमी बालीकेला जिंतूर ग्रामीण रुग्णालय दाखल केले तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. उम्मेकुलसूम खाजा मज्जिद यांनी प्राथमिक उपचार केले व जखमाचे स्वरूप गंभीर असल्याने बालिकेला पुढील उपचारासाठी परभणी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे .



शहरातील विविध भागांमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या वाढल्याने नागरिक व शालेय विद्यार्थी महिला ज्येष्ठ नागरिक यांना त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार मुख्य बाजारपेठ शासकीय कार्यालय परिसर सार्वजनिक मैदानी आणि रहिवासी भागात कुत्र्यांचे कळपमुखपणे वावरत असताना दिसत आहेत असे नागरिकांनीं आपली व्यथा मांडली यापूर्वी अशा घटना घडल्या असून भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रव्याकडे नगरपरिषद प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन प्रभावी उपायोजना कराव्यात अशी मागणी नागरिकांकडून होत आहे..

# परभणी जिल्ह्यातील वादळ वाऱ्याने झालेले नुकसानीचे पंचनामे सादर करण्याचेअधिकाऱ्यांना आदेश. कृषीमंत्री -मा. ना.दत्ता भरणे

## आ. राजेश विटेकर यांनी व्ही सि. द्वारे मांडली खरे वास्तव




**परभणी :** जिल्ह्यात काल झालेल्या मुसळदार पाऊस आणी वादळी सुसाट वाऱ्याने मानवत तालुक्यातील पिंपाळा व मांडे वडगाव तसेंच परभणी तालुक्यातील पोखर्णी मांडाखळी. इंडेवाडी सुक्रेवाडी. अनेक गावामधील अनेक शेतकऱ्याचे बागायती वकेळी शेती पिकांचे फार मोठे नुकसान जाहले आहे तसेंच वादळं वाऱ्यांनी विद्युत खांब उकडून पडले आहेत या पार्श्वभूमी वर आ राजेश विटेकर यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी व्हिडीओ कॉल द्वारे कृषी मंत्री मा. ना. दत्ता भरणे यांनावास्तव वस्तुस्थिती. दाखवली नंतर कृषी मंत्र्याने कृषी अधिकाऱ्यांना सर्व पिकाचे पंचनामे करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले

आमदार राजेश विटेकर यांनी रविवारी नुकसानग्रस्त भागाची शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष पाहणी करून भेट घेतली व त्यांच्या त्यांच्या अडचणी समजून घेतल्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचे चिंता आणि डोळ्यातील वेदना पाहून आमदार विटेकर हे भाऊक झाले. या संकटाच्या काळात त्यांना धीर देत संबंधित महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामे करून कोणत्याही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना दिल्या तसेच कृषी मंत्री माननीय नामदार दत्ता भरणे यांना केळी आणि इतर पिकांचे नुकसान थेट व्हिडिओ कॉल करून दाखवले गेले यावेळी उपस्थित तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांना कृषिमंत्री बोलले शेतकरी हा केवळ अन्नदाता नाही तर आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे त्यांच्या कष्टाचा सन्मान राखणे आणि संकटाच्या प्रत्येक क्षणी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही शासन आणि प्रशासन यांचे नैतिक जबाबदारी आहे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर योग्य ते आर्थिक मदत मिळावी यासाठी तुम्ही तात्काळ पंचनामे करूनअहवाल शासनाकडे सादर करावेत ताबडतोब कामाला लागा असे स्पष्टआदेश कृषिमंत्री यांनी अधिकाऱ्यांना दिले जिल्हा परिषद सदस्य सरपंच पदाधिकारी तहसीलदार गट विकास अधिकारी तालुका कृषी अधिकारी संबंधित विभागाचे कर्मचारी शेतकरी बांधव उपस्थित होते.

# वरद गणेश मंदिरात आज विष्णूयाग,पर्जन्य वृष्टी, शेतकरी समृद्धी प्रीत्यर्थ आयोजन

**छत्रपती संभाजीनगर:** श्री गणेश सभा समर्थनगर येथील वरद गणेश मंदिरातील अष्टविनायक सभागृहात मंगळवार (9 जून) रोजी सकाळी 9 ते दुपारी 2 या वेळेत विष्णूयाग आयोजित करण्यात आला असून यात 33 यजमान सहभागी होणार आहेत.पर्जन्य वृष्टी,शेतकरी कल्याणार्थ आयोजित यावेळी पंकज गुरुजी खोडेगावकर,गजानन जोशी,पीयूष देशपांडे यांच्या पौरोहित्याखाली गणेश पूजन,पुण्याह वाचन,मातृका पूजन,मुख्य आचार्य वर्णन आदी धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच मुख्य देवता महाविष्णूचे षोडशोपचार पूजन,सहस्र तुलसी अर्चन,नवग्रह पूजन,पंचसुक्त पौमान,श्रीसूक्त,पुरुष सूक्त व नानाविध हवन होणार आहे.यात तीळासह नऊ प्रकारच्या विष्णूप्रिय समिधांचे हवन केले जाणार आहे. पूर्णाहूती व प्रसाद वितरण करून यज्ञाने या यागाची सांगता होईल. या धार्मिक उपक्रमात भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन श्री गणेश सभेचे अध्यक्ष सुनील खोचे,उपाध्यक्ष देवेंद्र देव, सचिव अरविंद तेलवाडकर, सहसचिव अरूण जोशी,कोषाध्यक्ष अनिल वाळूजकर, विश्वस्त निर्मला तरटे,मयुरेश कोटणीस,जगदीश हर्सुलकर,रवींद्र सुतवणे,निशा छापेकर,अॅड. प्रशांत फडणवीस, उषा देशपांडे यांनी केले आहे.



**हिंदू धर्मात अधिक मासाला 'पुरुषोत्तम मास' असेही म्हणतात आणि हा महिना पूर्णपणे भगवान विष्णूच्या उपासनेसाठी समर्पित आहे. या महिन्यात विष्णू पूजा करणे अत्यंत महत्त्वाचे आहे कारण.पुरुषोत्तम नाव. पौराणिक कथेनुसार, भगवान विष्णूंनी स्वतः या अतिरिक्त महिन्याचा भार स्वीकारून त्याला आपले नाव ('पुरुषोत्तम') दिले, ज्यामुळे तो सर्वात पवित्र मानला जातो.पापमुक्ती आणि मोक्ष. अधिक मासात विष्णू पूजा, नामजप (विशेषतः 'ॐ नमो भगवते वासुदेवाय') आणि व्रते केल्याने सर्व पापांचा नाश होतो आणि मोक्षाचा मार्ग सुकर होतो.समृद्धी प्राप्ती- या काळात 'विष्णू सहस्त्रनाम' किंवा 'सत्यनारायण कथा' वाचल्याने घरात सुख, शांती आणि आर्थिक समृद्धी नांदते.दान आणि पुण्य. या महिन्यात केलेल्या दानाचे फळ इतर महिन्यांच्या तुलनेत अनेक पटीने अधिक मिळते**

**-पंकज खोडेगावकर गुरूजी**


मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911